खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### मराठी विभाग : राष्ट्रीय वाचन दिन (१९ जून २०२१)

# पुस्तकांशी मैत्री करण्याची गरज

प्राचार्य डॉ. कुलकर्णी : हुतात्मा राजगुरू महविद्यालयात 'चला वाचू या'



**राजगुरूनगर, दि. २२ (प्रतिनिधी)** - वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांनी केले.

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित 'चला वाचू या' उपक्रमाच्या ऑनलाइन उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. व्ही. डी कुलकर्णी म्हणाले, की तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले असले तरी तरुण पिढी समाजमाध्यमांचा अतिरेकामुळे भोवतालपासून दुरावत अधिकाधिक स्वतःत गुंतत चालली आहे. अशा परिस्थितीत पुस्तके आपल्याला जगाशी, भोवतालशी जोडून ठेवतील. त्यासाठी वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे म्हणाले की, केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी. एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून 'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. वाचन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी त्यांच्या आवडीच्या ग्रंथांचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनीही ऑनलाइन पद्धतीने या उपक्रमात सहभाग घेतला. ग्रंथालय विभागातर्फे फेसबुकवर बोलती पुस्तके या विषयी माहिती व पुस्तके उपलब्ध करून त्याची लिंक व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी आभार मानले.

प्रभात Wed, 23 June 2021 https://epaper.eprabhat.net/c/61330575

लोकमत



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिन साजरा करण्यात आला.

# 'समृद्ध जीवनासाठी पुस्तकांशी मैत्री गरजेची'

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर:** वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्यावतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित 'चला वाचू या' उपक्रमाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले असले तरी तरुण पिढी समाजमाध्यमांचा अतिरेकामुळे भोवतालपासून दुरावत अधिकाधिक स्वतःत गुंतत चालली आहे. अशा परिस्थितीत पुस्तकं आपल्याला जगाशी, भोवतालशी जोडून ठेवतील. त्यासाठी वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी.एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे, 'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अभिवाचन कार्यक्रमाद्वारे उत्तमोत्तम साहित्य नव्या पिढीसमोर आणण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले. ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jun 20, 2021
Powered by: erelego.com

**नवराष्ट्र**

## राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय वाचन दिन साजरा

# 'समृद्ध जीवनासाठी पुस्तकांशी मैत्री गरजेची'

राजगुरूनगर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित 'चला वाचू या' उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते.

### 'चला वाचू या' उपक्रमाचे उद्घाटन



डॉ.कुलकर्णी पुढे म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले असले तरी तरुण पिढी समाजमाध्यमांचा अतिरेकामुळे भोवतालपासून दुरावत अधिकाधिक स्वतःत गुंतत चालली आहे. अशा परिस्थितीत पुस्तकं आपल्याला जगाशी, भोवतालशी जोडून ठेवतील. त्यासाठी वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे.

## वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्न करा

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी.एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून 'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अभिवाचन कार्यक्रमाद्वारे उत्तमोत्तम साहित्य नव्या पिढीसमोर आणण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. वाचन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी त्यांच्या आवडीच्या ग्रंथांचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनीही ऑनलाईन पद्धतीने या उपक्रमात सहभाग घेतला. ग्रंथालय विभागातर्फे फेसबुकवर बोलती पुस्तके या विषयी माहिती व पुस्तके उपलब्ध करून त्याची लिंक व्हॅट्सअॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले. आभार ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी मानले.

Pune Plus Edition
21 June 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द RNI No. MAHMAR/2013/57952
● रविवार, दिनांक २० जून २०२१ ● वर्ष : ८ ● अंक : २७६ ● पाने ८ ● किंमत २ रूपये www.ja

# समृद्ध जीवनासाठी पुस्तकांशी मैत्री गरजेची : डॉ. कुलकर्णी

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी

राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन



वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित 'चला वाचू या' उपक्रमाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. व्ही. डी कुलकर्णी पुढे म्हणाले, की तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले असले तरी तरुण पिढी समाजमाध्यमांच्या अतिरेकामुळे भोवतालपासून दुरावत अधिकाधिक स्वत:त गुंतत चालली आहे. अशा परिस्थितीत पुस्तकं आपल्याला जगाशी, भोवतालशी जोडून ठेवतील. त्यासाठी वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केरळमधील पुस्तक आंदोलनाचे जनक पी.एन. पैनिकर यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय वाचन दिनाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून 'चला वाचू या' या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अभिवाचन कार्यक्रम द्वारे उत्तमोत्तम साहित्य नव्या पिढीसमोर आणण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. वाचन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांनी त्यांच्या आवडीच्या ग्रंथांचे अभिवाचन केले. विद्यार्थ्यांनीही ऑनलाईन पद्धतीने या उपक्रमात सहभाग घेतला.

ग्रंथालय विभागातर्फे फेसबुकवर बोलती पुस्तके या विषयी माहिती व पुस्तके उपलब्ध करून त्याची लिंक व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी मानले.

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

# समृद्ध जीवनासाठी पुस्तकांशी मैत्री गरजेची : डॉ. व्ही. डी. कुलकर्णी



**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** वाचन संस्काराने येणारी बहुश्रुतता जीवन समृद्ध करते. यासाठी सर्वांनीच पुस्तकांना आपल्या जगण्याचा भाग बनवून त्यांच्याशी मैत्री करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त आयोजित 'चला वाचू या' उपक्रमाच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे आणि इतर अभिवाचक प्राध्यापक उपस्थित होते. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी अभिवाचन कार्यक्रमाद्वारे उत्तमोत्तम साहित्य नव्या पिढीसमोर आणण्यासाठी मराठी विभागाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. 'वाचण्यासाठी शिका आणि शिकण्यासाठी वाचा' या मंत्रानुसार सर्वांनीच वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख